# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २१

## (सभावृत्तांत)

दिनांक–१०/०८/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरुवार, दिनांक १०/०८/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठुंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त,मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.तुपे, मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.आष्टीकर, मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.बहुरे,मा.दांगट,मा.राऊत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.निकम,मा.इंगळे, मा.तांबे,मा.घुबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.रत्नपारखी,मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले मा.मोरे,मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.मुंढे-सहा.प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ)-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ४४) | H1N1 (स्वाईन फ्ल्यू) आजारासाठी आवश्यक असणारे Tab Oseltamivir 75 mg. चे तातडीक खरेदी करणेबाबत... |
| विषय क्रमांक ४५) | टिचर व्हेरीफिकेशन फि भरणेबाबत.... |
| विषय क्रमांक ४६) | एच.ए. मैदानावर होणा-या आर्मी साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक (Know Your Army) या कार्यक्रमाकरीता विद्युत, ध्वनिक्षेपन, LED स्क्रीन, स्टेज लाईटिंग, CCTV कॅमेरे इ. ची व्यवस्था करणेबाबत... |
| विषय क्रमांक ४७) | प्रभाग क्र.३९,४०,४१ अंतर्गत सन २०१७ सार्वजनिक महापालिका निवडणूकीसाठी मंडप विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेचे कामास तरतूद वर्गीकरण करणेबाबत... |
| विषय क्रमांक ४८) | मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५५३ दि.२१/०६/२०१७ मध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.मोरेश्वर भोंडवे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव.... |
| विषय क्रमांक ४९) | प्र.क्र.१३ यमुनानगर मधील नाना नानी उद्यान व जलतरण तलाव प्रायोगिक तत्वावर देखभाल व संरक्षणाकामी देणेबाबत - मा.उत्तम केंदळे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५०) | प्र.क्र.१४ येथील कै.आकाश काळभोर व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा.वैशाली काळभोर, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५१) | पुणे महानगर परिवहन महामंडळाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या बसेसच्या बिलांची रक्कम अदा करणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५२) | पिंपरी चिंचवड फेस्टिवलबाबत-मा.राजू मिसाळ,मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव... |

-----------

**निर्णय**–१) **<u>गणेश विसर्जन घाटांवरील व्यवस्थेबाबत -</u>**

अ) शहरातील गणेश विसर्जन घाटांची दूरावस्था आहे. डागडूजीची कामे स्थापत्य विभागाने करावी. असे मा.शहर अभियंता यांना सूचित करणेत येते आहे. घाटांवर निर्माल्यकुंडांची व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने विसर्जन घाटांवर जास्तीत जास्त स्वच्छता राहील याची खबरदारी घ्यावी. मा.सहशहर अभियंता, विद्युत विभाग आपणास सूचित करणेत येते की, विसर्जन घाटांवर मोठमोठे फ्लडलाईटस् लावावेत सीसीटीव्ही कॅमेरा आणि प्रकाश व्यवस्था चांगली असली पाहीजे.

ब) इंद्रायणीनगर भागातील नागरीकांना मोशी येथे गणपती विसर्जन करण्यासाठी जावे लागते. परंतू तेथे नदीमध्ये गणपतींचे विसर्जन करु दिले जात नाही. म्हणून हौदांत गणपतींचे विसर्जन करण्यासाठी जागांचा सर्वे करुन एक जागा निश्चित करून तसे कळवावे. गणपती विसर्जन हौद ठेवण्याची व्यवस्था करावी. याकरिता नागरीकांना देखील आवाहन करता येईल.

२) **<u>जाहिरात बोर्डबाबत</u> –** याआधी सूचित केल्याप्रमाणे, आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाई करताना सर्व एजन्सीजच्या बोर्डवर कारवाई करण्यात यावी.

------------

ठराव क्रमांक – ७६५ विषय क्रमांक – १

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/६५४/२०१७ दि.१३/०७/२०१७

विषय -शालेय पोषण आहार सन २०१६-१७ योजनेअंतर्गत तरतुद वर्ग करणेकामी नविन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत...

मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.१ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६६ विषय क्रमांक – २

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/१९१/१७ दि.१९/०७/२०१७

विषय- सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन अंदाजपत्रक तरतुद रक्कम वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत...

मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.२ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६७ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/७/कावि/१४९/२०१७ दि.२८/०७/२०१७

विषय- सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाकरिता माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ हा उपक्रम राबविणेकामी व येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६८ विषय क्रमांक – ४
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – संगीत अकादमी
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- १) मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.संअ/१/कावि/४७/२०१७ दि.२८/०७/२०१७
२) मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.संअ/१/कावि/५३/२०१७ दि.१०/०८/२०१७

विषय - पं.डॉ.नंदकिशोर कपोते, मानद सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार विषयपत्र नव्याने सादर करावयाचे असल्याने मा.अतिरिक्त आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.२ कामीचा मा.अतिरिक्त आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६९ विषय क्रमांक – ५
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/६७५/२०१७ दि.१७/०७/२०१७

विषय- निवडणूक विभागास सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील रक्कम निवडणूक खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबत...

मा.आयुक्त यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.५ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७० विषय क्रमांक – ६
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२१९/२०१७ दि.३१/०७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-2017 मधील अ.क्र.4 अन्वये प्रभाग क्र.२१ दळवीनगर येथील आरक्षण क्र.२७५ येथे नव्याने तयार होणा-या शाळेच्या इमारतीचे विद्युतीकरण करणे व या कामातुन थेरगाव 'ग' क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युतिकरणाचे काम करणेकामी मे.अवधूत इलेक्ट्रिकल लाईफ अँड सर्व्हिसेस नि.र.रू.4,49,924/- (अक्षरी र.रू.चार लाख एकोणपन्नास हजार नऊशे चौवीस फक्त) पेक्षा 15.94% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७१ विषय क्रमांक – ७

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – उद्यान

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/६६०/२०१७ दि.०१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१०/१/२०१६-१७ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडुन ताब्यात आलेले नाले सुशोभिकरण, देखभाल व संरक्षण करणेकामी मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हीसेस या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय निविदा रक्कम रुपये १,२९,६९,६२४/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणतीस लाख एकोणसत्तर हजार सहाशे चोवीस फक्त) दरापेक्षा -२४.९९% टक्के कमी दराने स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७२ विषय क्रमांक – ८

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/७/कावि/१५१/२०१७ दि.२/८/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, परिसरातील शाळेमधून खेळाडू विदयार्थी तयार करून भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीपर्यंत विदयार्थ्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तसेच शहरांचे नांव लौकीकात भर घालण्याचे दृष्टीने माध्यमिक शिक्षण विभागाचे वतीने २००१ पासून उदयमनगर या ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी हे क्रीडा विदयालय सुरू करण्यात आलेले आहे. या विदयालयामध्ये बॅटरी द्वारे मुलांची शारीरिक क्षमता विचारात घेवून विदयालयातून कबड्डी, खोखो, योगा इत्यादी खेळ शिकविणेकामी क्रीडा प्रबोधिनी विदयालयाकडील एकत्रित मानधनावर कार्यरत असलेले १) श्री.करवंदे अविनाश किसन २) श्री.देशमुख दिनेश पोपटराव ३) श्रीम.जगदाळे स्वाती मधुकर ४) श्रीम. गायकवाड लविना मॅन्युअल या तज्ञ क्रीडा शिक्षकांना दरमहा १५०००/- एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणे व त्या करिता येणा-या एकूण र.रू.३,६०,०००/- चे खर्चास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३ विषय क्रमांक – ९

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – बांधकाम परवानगी

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीपी/कावि/मोशी/प्र-६/१८६/१७ दि.०१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

प्रस्तावात नमूद प्रमाणे ए.आर.कम्युनिकेशन टेलिव्हेंचर्स प्रा.लि. यांची नविन मोबाईल टॉवर्सला परवानगी व जुने अस्तित्वात असलेले टॉवर्स नियमीतीकरण करणेसाठी मध्यस्थ/ सहाय्यक म्हणुन नेमणुक करणेबाबत व त्यांचे सोबत करारनामा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी

असलीतरी प्रस्तावीत केलेल्या कामासाठी ए.आर.कम्युनिकेशन टेलिव्हेंचर्स प्रा.लि. यांचेऐवजी किमया असोसिएटस यांची नेमणूक करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४ विषय क्रमांक – १०
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१६९/२०१७ दि.२/८/२०१७

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 24-2016/17 मधील अ.क्र.01 अन्वये सन 2016-17 करीता क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानांतील हायमास्ट दिव्यांचे देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.ओमकार इंजिनिअरिंग नि.र.रू.9,99,168/- (अक्षरी र.रू.नऊ लाख नव्व्याण्णव हजार एकशे अड्ुसष्ट फक्त) पेक्षा 27.90% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७५ विषय क्रमांक – ११
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१११/२०१७ दि.२/८/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-17 मधील अ.क्र.15 अन्वये सन २०१६-१७ करीता अ क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानांतील विद्युत यंत्रणेची देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. औंकार इंजिनिअरिंग नि.र.रू.4,20,012/- (अक्षरी र.रू.चार लाख वीस हजार बारा फक्त) पेक्षा 19.99% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७६ विषय क्रमांक – १२
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/११३/२०१७ दि.२/८/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-17 मधील अ.क्र.17 अन्वये सन २०१६-१७ करीता अ क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील उद्यानांतील विविध प्रकारचे बोअरवेल व इतर पंपाचे देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. औंकार इंजिनिअरिंग नि.र.रू.2,80,021/- (अक्षरी र.रू.दोन लाख ऐंशी हजार एकवीस फक्त) पेक्षा 12.60% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला

असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७७७ विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१०९/२०१७ दि.२/८/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 15/2016-17 मधील अ.क्र.9 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालयात उद्यानात नवीन विद्युत पंप बसविणेकामी मे.औंकार इंजिनिअरिंग नि.र.रू.13,99,834/- (अक्षरी र.रू. तेरा लाख नव्यान्नव हजार आठशे चौतीस फक्त) पेक्षा 12.60% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७७८ विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२३७/२०१७ दि.२/८/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 15/2016-17 मधील अ.क्र.1 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ काळभोरनगर परीसरातील स्ट्रिट लाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी (सन २०१६-१७) मे.आर.एन.एंटरप्रायजेस नि.र.रू.7,49,329/- (अक्षरी र.रू.सात लाख एकोणपन्नास हजार तीनशे एकोणतीस फक्त) पेक्षा 23.23% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७७९ विषय क्रमांक – १५

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१३०/२०१७ दि.०३/०८/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१७/०७/२०१७ ते दि.२३/०७/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३०/२०१७ दि.०३.०८.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८०
विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/०८/२०१७
विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.कोमल मेवानी
अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/२१८/१७ दि.०३/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.२३/०६/२०१७ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथील **2nd Anniversary Celebration of the Smart Cities Mission** करीता उपस्थित राहणेकामी श्री.निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी स्वखर्चाने केलेल्या वाहन व निवास व्यवस्था इ. आवश्यक खर्चाची रक्कम रु.३,४००/- (अक्षरी र.रू.तीन हजार चारशे फक्त) चे बीलांची प्रतिपुर्ती करणे तसेच श्री.अच्युत हांगे, अतिरिक्त आयुक्त व श्री.निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे विमान प्रवासापोटी आलेला खर्च मे. RADIANT AIRLINKS PVT. LTD. यांना सेवा करासह रक्कम रु.४७,७९१/-(अक्षरी र.रू. सत्तेचाळीस हजार सातशे एक्यान्नव फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८१
विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/०८/२०१७
विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.कुंदन गायकवाड
अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४८६/२०१७ दि.०३/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१७/१०/२०१६-१७ अन्वये से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्राचे यांत्रिक व तांत्रिक विषयक देखभाल दुरूस्ती करणेकामी (नियमित निगा व कामकाज सुरळीत राखणेसाठी) मे. युनिक ट्रेडर्स निविदा रक्कम रू.६०,४१,१२७/- (अक्षरी र.रू.साठ लाख एक्केचाळीस हजार एकशे सत्तावीस फक्त) पेक्षा १६.९६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५२,६७,३७९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८२
विषय क्रमांक – १८
दिनांक – १०/०८/२०१७
विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.लक्ष्मण उंडे
अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४८७/२०१७ दि.०३/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.९/९/२०१६-१७ अन्वये दापोडी साठवण टाकी ते आंबेडकर पुतळा मुख्य ४०० मि.मी. व्यासाची वितरण वाहिनी टाकणेकामी मे.एस.एस.साठे यांची निविदा रक्कम रू.४२,०१,६७७/- (अक्षरी र.रू. बेचाळीस लाख एक हजार सहाशे सत्त्याहत्तर फक्त) पेक्षा ५.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४१,९१,१७२/- पर्यंत काम करुन घेणेस

तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७८३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/७४८/२०१६ दि.३१/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील **टाळगाव चिखली येथे संतपीठ तयार करणेकामी आर्कीटेक्ट नेमणे गरजेचे असून** सदर कामासाठी निविदा पश्चात कामांवर दैनंदिन देखरेख ठेवणे, कामांची प्रगती, गुणवत्ता मोजणे, कामांची बिले तयार करणे व विविध कार्यालयीन कामकाजासाठी विविध विभागात समन्वय साधणेसाठी तसेच विविध अद्यावत विषय संकल्पना प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंसी नेमणे आवश्यक आहे. सदर बाबीचा विचार करता **मे./श्री.नुयोग शिवजी जबूवाणी यांची आर्किटेक्ट** म्हणून तसेच निविदा पश्चात सदर कामांवर दैनंदिन देखभाल, नियंत्रण ठेवणेसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंट म्हणून नेमणूक करणे सुयोग्य होईल. त्यानुसार अंदाजपत्रकिय रक्कमेच्या २% सर्व करासह आर्किटेक्ट म्हणून प्रिटेंडर (निविदा पुर्व) आणि पोस्ट टेंडर अॅक्टीव्हीटी मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून प्रत्यक्ष होणा-या कामांच्या १.३५% सर्व करासह (मनपा नियमानुसार) नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७८४ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६९४/२०१७ दि.३/८/२०१७

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७८५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६९५/२०१७ दि.३/८/२०१७

मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे वापरातील म.न.पा वाहन क्र.MH-१४-CL-०३३५ (टाटा मांझा) करिता ५ नग नविन सीएट टायर्स मे.गणराज एंटरप्रायजेस यांचेकडून निविदा न मागविता,

कोटेशन न मागविता,करारनामा न करता,थेट पध्दतीने त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार खरेदी करणेस व त्याकामी र.रू.20,218/- (अक्षरी र.रू.वीस हजार दोनशे अठरा फक्त) खर्चास तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८६ विषय क्रमांक – २२

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/९४६/२०१७ दि.०३/०८/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवीन 'ग' व 'ह' प्रभाग कार्यालयांसाठी आवश्यक संगणक साहित्य खरेदीकामी ऑनलाईन निविदा सुचना क्र.०६/०२/२०१७-१८ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.धर्मे एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून तीन प्रकारचे आवश्यक संगणक साहित्य (बॅकअप सॉप्टवेअर,४ टीबी हार्डडिस्क व २४ पोर्ट स्वीच) खरेदीकामी र.रु.४,६१,५३०/- व मे.एम.के. एंटरप्रायजेस यांचेकडून एक प्रकारचे ८ पोर्ट स्वीच साहित्य खरेदीकामी र.रु.६४,८००/- असे एकत्रीत एकूण र.रु.५,२६,३३०/-(अक्षरी र.रु.पाच लाख सव्वीस हजार तीनशे तीस फक्त) या रक्कमेचे त्यांचे बरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८७ विषय क्रमांक – २३

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/१६६/२०१७ दि.३/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या कार्यक्षेत्रामध्ये विविध संसर्गजन्य आजार तसेच वैद्यकीय, आरोग्य, तसेच पर्यावरण विषयक जनजागृती करीता व राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अमंलबजावणी करणेसाठी नागरीकांमध्ये जनजागृती करणेकामी शहराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी विविध आकर्षक रंगांचा वापर करुन विविध चित्रांद्वारे व विविध घोषणांद्वारे मनपा कार्यक्षेत्रामध्ये महत्वाचे चौक, शासकीय इमारती, विविध गृहरचना संस्था यांच्या सिमा भिंती यावर वॉल साईन बोर्ड बनवून घेणेबाबतची ई-निविदा क्र. १३/२०१५-१६ मधील लघुत्तम निविदाधारक मे. सुरज अडव्हरटायझिंग यांचे प्राप्त झालेल्या लघुत्तम दर प्रति चौ.फूट र.रु.२७.३३/- या दराने करारनामा करुन वॉल साईन बोर्ड बनवून घेणेकामी द्वितीय टप्प्याकरीता र.रु.९,५०,२५०/- खर्चास मान्यता देणेस तसेच सदरचा खर्च वैद्यकिय विभागाकडील शासकिय योजनांची अंमलबजावणी या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –७८८ विषय क्रमांक – २४
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कावि/बीआरटीएस/४४४/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत बीआरटीएस रस्ते विकसीत करणे व त्यावरील उड्डाणपुल, सब-वे, ग्रेड सेपरेटर, फुटओव्हर ब्रीज तसेच रस्ता रुंदीकरण करणेची कामे करणेत येतात. या विभागामार्फत सांगवी–किवळे, नाशिक फाटा–वाकड या रस्त्यांवर बीआरटीएस बस सेवा सुरु करण्यात आली आहे. दापोडी ते निगडी या रस्त्यावर माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये बीआरटीएस बस सेवा सुरु करणेचे नियोजन आहे. तसेच काळेवाडी फाटा ते देहू आळंदी या बीआरटीएस रस्त्यावर माहे डिसेंबर २०१७ मध्ये बीआरटीएस बस सेवा सुरु करणेचे नियोजन आहे. सांगवी-किवळे या रस्त्यावरील रक्षक चौक , पार्क स्ट्रिट येथील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सबवे बांधणे आवश्यक आहे. तसेच पुनावळे ते मुकाई टर्मिनल पर्यंतच्या रस्त्याचे डी.पी. नुसार रुंदीकरण करणे आवश्यक आहे. देहू ते आळंदी या रस्त्याची मनपा हद्दीमधील रुंदीकरणाची कामे पूर्ण झाली असून झेंडेमळा ते मनपा हद्दीपर्यंतचा रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून देखभाल दुरुस्तीसाठी मनपाकडे हस्तांतरीत करणेत आलेला आहे. स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील प्रस्तावात नमूद केल्यानुसार रस्ते विकसीत करणे व त्यावरील पुल/सबवे बांधणे याकामी यामधील तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची प्रस्तावात नमूद प्रमाणे नेमणूक करणेस व मनपाचे प्रचलित पध्दती नुसार प्रस्ताव नमूद प्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७८९ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कक्षे/कावि/४२४/२०१७ दि.०२/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय विभागाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.६२ मधील कासारवाडी येथे नवीन शाळा इमारत बांधणेकामी इमारतीचे नकाशे बनविणे प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवाना घेणे व निविदापुर्व कार्यवाही पर्यत सर्व कामे करणेकामी मे.हर्षल कवडीकर (आर्किटेक्टस अँन्ड डिझाईनर) पुणे यांची वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व त्यासाठी त्यांना म.न.पा. मान्य दराने कामाच्या किंमतीच्या र.रू.५० लाखा पर्यंत ३% व ५० लाखाच्या पुढे २% या प्रमाणे सर्वकरांसह फि अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९०	विषय क्रमांक – २६
दिनांक – १०/०८/२०१७	विभाग – उद्यान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे	अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२४८/२०१७ दि.३१/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.वृक्ष १/२०१७-१८ क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वृक्ष रस्त्याचे कडेचे वृक्षारोपणासाठी ५००० लीटर क्षमतेच्या टॅंकरने पाणीपुरवठा करणेचे कामकाज मे.संदीप ट्रान्सपोर्ट यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर र.रू.१,८९,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोणनव्वद हजार फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०१% ने कमी (र.रू.१,८७,११०/-) या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/४/कावि/२३१/२०१७ दि.३०/०५/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९१	विषय क्रमांक – २७
दिनांक – १०/०८/२०१७	विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे	अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/४९६/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

रस्ते/गटर सफाई कामासाठी किमान वेतन दराने कामगार पुरविणेकामी अ क्षेत्रीय कार्यालयाकडे ७ संस्थांकडून एकूण १०९ कामगार उपलब्ध करणेत आलेले आहेत. यापैकी श्री व्यंकटेश्वरा बेरोजगार सेवाभावी संस्था मर्या. यांचेकडून प्रभाग क्र.२६ व प्रभाग क्र.२७ साठी १४ कामगारांकडून रस्ते, गटर्स यांची साफसफाई करण्यात येत आहे. सदर कामगारांचे बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्यांना वेतन बॅंक खात्याव्दारे वेळेवर अदा करण्यात येत नाही. तसेच सदर कामगारांना ई.एस.आय. कार्ड देण्यात आलेले नाही. तसेच सदरची रक्कम संबंधित खात्यात भरणा केली नसल्याने सदर योजनाचा लाभ संबंधितांना घेता येत नाही. तसेच कामगारांना पी.एफ. खातेक्रमांक देण्यात आलेले नाहीत असे कामगारांचे म्हणणे आहे. तसेच सदर संस्थेस दि.२२/२/२०१७ रोजी नोटीस देवुन कागदपत्रांची पुर्तता करणेकामी कळविले असता देखील त्यांनी सदर नोटीसचा खुलासा केलेला नाही. सदर कामाची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असलेने 'अ' क्षेत्रीय कार्यालय व सदरचे काम करण्यास तयार असलेल्या संस्थेने मागणी केलेनुसार श्री व्यंकटेश्वरा बेरोजगार सेवाभावी संस्था मर्या. यांचे काम बंद करुन त्याठिकाणी श्री बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांना दि.०१/०३/२०१७ पासून १४ कामगार पुरविणेचे अतिरिक्त काम देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** –दोन महिने मुदतवाढ देऊन विषय क्र.२७ मंजूर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक – ७९२ विषय क्रमांक – २८

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/४९७/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

रस्ते/गटर सफाई कामासाठी किमान वेतन दराने कामगार पुरविणेकामी इ क्षेत्रीय कार्यालयाकडे १६ संस्थांकडून एकूण २०९ कामगार उपलब्ध करणेत आलेले आहेत. यापैकी मे.देव स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांचेकडून प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर येथे दररोज १३ कामगारांकडून रस्ते, गटर्स यांची साफसफाई करण्यात येत आहे. सदर संस्थेस माहे फेब्रुवारी २०१७ अखेरचे बिल अदा केले आहे. तथापि संबंधित प्रभागाचे आरोग्य निरिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्याचे कळविले आहे.

१) सदर संस्थेचा मालक/सुपरवायझर हे दररोज ६ ते ८ कर्मचारी पुरवीत आहेत. तसेच मोबाईलवरुन संपर्क केला असता फोन उचलत नाहीत व करीतही नाहीत तसेच आरोग्य निरिक्षक कार्यालय, इंद्रायणीनगर येथेही येत नाहीत.

२) सदर संस्थेच्या कर्मचा-यांकडे सुरक्षा साधने व इतर साहित्यांची चौकशी केली असता फक्त साडी, हॅण्डग्लोज व घमेली इ. साहित्य तेही फक्त एकदाच दिले असल्याचे सांगीतले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता संस्थेकडून दैनंदिन साफसफाईचे काम करुन घेणे अवघड जात असल्याने सदर संस्थेस मुदतवाढ देऊ नये असे “इ” क्षेत्रीय कार्यालयास कळविले आहे. तसेच सदर संस्थेने कर्मचा-यांचे पी.एफ. जमा करीत नसल्याचे दिसुन आले आहे. संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना माहे मार्च, एप्रिल व मे २०१७ चे वेतन अदा केले नसल्याने सदर कर्मचा-यांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी वारंवार “इ” क्षेत्रीय कार्यालयाकडे येत असल्याने मे.देव स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन केले नसल्याने सदर संस्थेचे काम बंद करुन त्याऐवजी पर्यायी संस्थेची नेमणुक करणेबाबत कळविले आहे. “इ” क्षेत्रीय कार्यालयाने सदर कामाची पर्यायी व्यवस्था करणेकामी कळविलेनुसार तसेच सदरचे काम करण्यास तयार असलेल्या श्री साई स्वंयरोजगार सहकारी संस्था मर्या. व श्री दत्त स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. हे काम करण्यास तयार असलेने दि.०१/०४/२०१७ पासून मे.देव स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था यांचे काम बंद करुन श्री साई स्वंय.सह.संस्था यांना ७ कामगार व श्री दत्त स्वंय.सह.संस्था यांना ६ कामगार असे एकूण १३ कामगार पुरविणेचे अतिरिक्त काम देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – दोन महिने मुदतवाढ देऊन विषय क्र.२८ मंजूर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक – ७९३ विषय क्रमांक – २९
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/२/१३९०/२०१७ दि.४/८/२०१७
विषय- प्रभाग क्र.७ वडमुखवाडी स.नं. १२३ मधील मनपाच्या ताब्यात आलेला सुविधा भुखंड विकसित करणेबाबत....

विषय क्रमांक २९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९४ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४९२/२०१७ दि.०४/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/२/२०१६-१७ अन्वये सेक्टर क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३ येथील बॅकवॉशच्या टाकीला गळती थांबवण्यासाठी सुरक्षा आवरण करून घेणे व तदनुषंगिक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस निविदा रक्कम रू.३३,००,५०१/- (अक्षरी र.रू. तेहतीस लाख पाचशे एक फक्त) पेक्षा ४.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३३,२६,९०५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९५ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४९१/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१७/१/२०१६-१७ अन्वये जलशुद्धीकरणकेंद्र आवारातील रस्त्याचे डांबरीकरणकरणे व सुशोभीकरण करणेकामी मे.एच.सी.लुंकड निविदा रक्कम रू.६३,४४,४६९/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ट लाख चव्वेचाळीस हजार चारशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा ११.२५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५९,१२,२५२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन

घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७९६ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२४४/२०१७ दि.०४/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र. 3/1-2017-18 मधील अ.क्र.1 अन्वये पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास पिंपरी ते दापोडी दरम्यान अडथळा करणारे स्ट्रीट लाईटचे खांब हलविणेकामी मे. इलेक्ट्रो मेकॉनिक्स नि.र.रू.3,15,13,419/- (अक्षरी र.रू. तीन कोटी पंधरा लाख तेरा हजार चारशे एकोणीस फक्त) पेक्षा 18.00% कमी दराने या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७९७ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१३१/२०१७ दि.०३/०८/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२४/०७/२०१७ ते दि.३०/०७/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३१/२०१७ दि.०३.०८.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७९८ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/३२३/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिखली से.क्र. १७ व १९ येथे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी (EWS) प्रकल्पामध्ये दवाखाना, भाजी मंडई व सांस्कृतिक भवन इ. सुविधा पुरविणेकामी आर्किटेक्ट व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.लेंडमार्क डिझाइन ग्रुप यांची निविदापुर्व कामाकरिता प्रकल्पाच्या अंदाजित रकमेच्या ०.९० टक्के व निविदा पश्चात कामासाठी (पीएमसी) कामाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या १.४५ टक्के अशी एकूण २.३५ टक्के दराने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७९९ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/३२४/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील शहर विकास अराखडा या लेखाशिर्षावरिल तरतूदी मधून से.क्र.१७ व १९ येथील घरकुल (EWS) प्रकल्पातील दवाखाना, भाजी मंडई व सांस्कृतिक भवन या सुविधा देणेकामीचे आरक्षणे प्राधान्याने विकसित करणे आवश्यक आहे त्याकरिता सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.८ व ९ अ.क्र.१८ वर शहर विकास आराखड्या करिता र.रू.२,०५,००,००,०००/- इतकी तरतूद आहे. सदरची तरतूद शहर विकास आराखड्यातील आरक्षणे विकास करण्यासाठी आहे त्या तरतूदी म्हणून प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील चिखली से.क्र.१७ व १९ मधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या गृहप्रकल्पातील दवाखाना भाजी मंडई व सांस्कृतिक भवनची कामे करणेसाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०० विषय क्रमांक – ३६

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४९६/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३/९/२०१७-१८ अन्वये मनपाच्या सांगवी गावठाण, सांगवी पीडब्ल्यूडी, सांगवी स.नं.८४, पिंपळे गुरव व दापोडी येथील पंप हाऊसचे चालन करणेकामी मे. शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४९,७९,९२६/- (अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख एकोणऐंशी हजार नऊशे सव्वीस फक्त) पेक्षा ३.४३% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५०,४९,५७०/-पर्यंत कामकरुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०१ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४९५/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र. ३/७/२०१७-१८ अन्वये मनपाच्या लांडेवाडी, बोपखेल,स.नं.९६ व रहाटणीयेथील शुध्द पाणीपुरवठा करणा-या पंपहाउसचे चालन करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू. ३३,११,६५२/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख अकरा हजार सहाशे बावन्न फक्त) पेक्षा ३.४२% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३३,५८,३१३/- पर्यंत कामकरुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०२ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – बी.आर.टी.एस.स्थापत्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बी.आर.टी.एस./४५७/२०१७ दि.४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे वाकड येथील कस्पटे चौकामध्ये ग्रेड सेपरेटर व उड्डाणपूल या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. स्तुप कन्सलटंन्ट इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाच्या मान्य व प्रचलित दरानुसार प्रकल्प निविदा रक्कमेच्या निविदा पुर्व (Pre Tender) कामाकरीता र.रू.४,००,०००/- + सॉईल इन्व्हेस्टीगेशनसाठी स्विकृत दर सुचीनुसार दर (DSR)+ १५% या दराने व निविदेनंतरचे (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रकल्प रक्कमेच्या १.८०%+०.५०% प्रुफ चेकिंग करीता + सेवाकर अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०३ विषय क्रमांक – ३९
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – बी.आर.टी.एस.स्थापत्य
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बी.आर.टी.एस./४५८/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे वाकड येथील मनपा. शाळा चौकामध्ये ग्रेड सेपरेटर व उड्डाणपूल या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.स्तुप कन्सलटंन्ट इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे यांना प्रकल्प

व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस मनपाच्या मान्य व प्रचलित दरानुसार प्रकल्प निविदा रक्कमेच्या निविदा पुर्व(Pre Tender) कामाकरीता र.रू.४,००,०००/- + सॉईल इन्व्हेस्टीगेशनसाठी स्विकृत दरसुचीनुसार दर (DSR)+ १५% या दराने व निविदेनंतरचे (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रकल्प रक्कमेच्या १.८०%+०.५०% प्रुफ चेकिंग करीता + सेवाकर अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०४ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/स्था/कावि/८४३/२०१७ दि.०३/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र.१७३ येथे सिमाभिंत बांधणे या कामांच्या सल्लागार पदी मे.आकार अभिनव कन्सलटंन्ट प्रा.लि. यांची नेमणूक करून कन्सल्टींग फी म्हणून महापालिकेच्या प्रचालित दरानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना स्विकृत निविदा रक्कमेच्या (Accepted Tender Cost) २.३५% फी (निविदा पुर्व बांबीसाठी ०.९०% व निविदा पश्चात बाबींसाठी प्रत्यक्ष खर्चाचा १.४५% अधिक सेवा कर) देणेत येते. त्यानुसार मे.आकार अभिनव कन्सलटन्ट प्रा.लि. यांना उपरोक्त विषयांकित कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पदी(प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंन्ट) व मनपाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनेलवर नेमणूक करणेत येऊन पिंपरी चिंचवड मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०५ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२४८/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.29/2016-17 मधील अ.क्र.1 अन्वये पिंपळे गुरव येथे बांधण्यात येत असणा-या प्रेक्षागृहाकरीता अत्याधुनिक पध्दतीची ध्वनीक्षेपन यंत्रणा बसविणेकामी मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्क्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. नि.र.रू.85,99,986/- (अक्षरी र.रू.पंच्याऐंशी लाख नव्याण्णव हजार नऊशे शहाऐंशी फक्त) पेक्षा 5.00% जादा या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०६ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/४००/२०१७ दि.५/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व बॉम्बे इंजिनियरिंग ग्रुप, खडकी, पुणे ०३ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.११ व शनिवार दि.१२ ऑगस्ट २०१७ रोजी Know Your Army या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रदर्शन यशस्वीरित्या पार पाडणेकामी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत मान्यवरांसाठी चहापान, नाष्टा व भोजन व्यवस्था, फ्लेक्स व स्टेज, कमान बँनर, सूत्र संचालक मानधन, प्रसिध्दी इत्यादि थेट खर्चासाठी र.रू.५,९५,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख पंच्याण्णव हजार फक्त) अपेक्षित आहे. सदरचे अंदाजे अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०७ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/७३८/२०१७ दि.०७/०७/२०१७

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठ.क्र.३३ दिनांक २८/०७/२०१७ नुसार

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा उपस्थित क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक, पाहुणे यांचा चहापान-अल्पोपहार खर्च, पाहुणे सत्कारार्थ बुके खरेदी, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ., सन २०१७-१८ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटने मार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी औषध खर्च इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.१७,००,९००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१७-१८ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी - वार्षिक स्पर्धा क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य या दोन लेखाशिर्षावर केलेल्या प्रत्येकी र.रु.२०,००,०००/- प्रमाणे एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१७-१८ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे.त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**निर्णय**- १) कबड्डीचे राज्यस्तरीय सामने घेण्यात यावेत. महापौर चषक स्पर्धा भरवावी. मा.महापौर यांना तसे पत्र द्यावे.

२) सहा.आयुक्त, क्रिडा विभाग यांना सूचित करणेत येते की, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते आहे, त्याठिकाणी खेळाडूंसाठी टँकरने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. टँकरला तोटी बसवा. स्पर्धेला येणा-या मुले/मुलींना पाणी पिण्याकरीता प्लॅस्टीक ग्लास/साखळीदंड लावून स्टीलचे ग्लास ठेवायची व्यवस्था करावी.

----------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक –८०८ विषय क्रमांक – ४४
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१४३/२०१७ दि.०९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

H1N1 (स्वाईन फ्ल्यु) आजाराचे रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने तातडीची आवश्यकता लक्षात घेता मनपाकडील नोंदणीकृत निविदाधारक मे.शशी एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडून Tab Oseltamivir 75 mg च्या २०,००० गोळ्यांची र.रु.३९८/- प्रति स्ट्रीप (१० गोळ्या, GST करासहित) या दराने खरेदी करण्यास व त्याकामी होणा-या र.रु.७,९६,०००/- चे खर्चास करारनामा करुन व आवश्यकतेप्रमाणे टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८०९ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/११/कावि/४००/२०१७ दि.०९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये ११ वैद्यकिय शाखांचे पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा कोर्सेससाठी मुंबईच्या कॉलेज ऑफ फिजीशियन अँड सर्जन, मुंबई (सी.पी.एस.) या अभिमत विद्यापीठाची मान्यता मिळणा-या जागांसाठी टिचर व्हेरीफिकेशन व अफिलेशन फी करीता र.रु.१६,०५,०००/- रकमेच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१० विषय क्रमांक – ४६
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग–क क्षेत्रिय कार्यालय, विद्युत
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/जा/५०/२०१७ दि.१०/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एच.ए. मैदानावर होणा-या आर्मी साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक (Know Your Arrny) या कार्यक्रमाकरीता विद्युत,ध्वनिक्षेपन,LED स्क्रीन, स्टेज लाईटिंग, CCTV कॅमेरे इ.ची व्यवस्था आवश्यकतेप्रमाणे जनरेटरसह करणे या कामास व त्यापोटी येणारा प्रत्यक्ष खर्च र.रु.६,३९,१३७/- यांस चालु निविदा दराने (०.९०% कमी) दराने करारनामा न करता थेट पद्धतीने अदा करणेस व सदर अचानक उद्भवलेल्या कामाच्या खर्चास व थेट पद्धतीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** १) आर्मी साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक (Know Your Arrny) या कार्यक्रमाचे जाहीरातीचे फ्लेक्स शहरातील मुख्य चौकांमध्ये लावावेत.

२) मा.सहआयुक्त आपणास सूचित करणेत येत की, सर्व प्रभाग अधिकारी, सहा.आयुक्त यांची मदत घ्यावी. नगरसचिव यांची मदत घ्यावी. शहरातील महापालिकेच्या तसेच सर्व खाजगी शाळांतील मुख्याध्यापक,शिक्षक यांना फोन करुन कळवावे. पत्र पाठवावे. शहरातील महाविद्यालयांमध्ये रितसर निमंत्रण गेले पाहीजे.

३) सर्व नगरसेवकांना या कार्यक्रमाचे निमंत्रण गेले पाहीजे. कार्यक्रमाची रुपरेषा ठरवावी. नगरसेवकांना बैठक व्यवस्थेबाबतही कळविण्यात यावे.

----------

ठराव क्रमांक –८११ विषय क्रमांक – ४७
दिनांक – १०/०८/२०१७ विभाग–स्थापत्य
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कक्षे/कावि/५८८/२०१७ दि.१०/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.३९,४०,४१ अंतर्गत सन २०१७ सार्वजनिक महापालिका निवडणूकांसाठी मंडप विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेचे काम मे.लालदीप कन्स्ट्रक्शन हे निविदा क्र.२६/८०/२०१६-१७ अन्वये करीत आहेत. प्रस्तुत कामांतर्गत प्रभाग क्र.३९,४०,४१ अंतर्गत सन २०१७ सार्वजनिक महापालिका निवडणुकांसाठी मंडप विषयक व इतर अनुषंगिक कामे करणे असे आहे. सदर कामातून महापालिका निवडणूकीसाठी मंडप पुरवण्याचे काम करण्यात आले आहे. सद्यस्थितीत काम सुमारे ९५% पूर्ण करण्यात आलेले आहे. भारतीय सैन्य दलाच्या आयुधांचे व रणगाडे इत्यादींचे प्रदर्शन एच.ए. मैदान, पिंपरी येथे भरवण्यात येत आहे. त्याकरिता आवश्यकतेनुसार सदर कामासाठी एच.ए. मैदानावर मंडप उभारणी व इतर अनुषंगिक कामे करणे असल्याने सदर काम हे विषयांकित कामातून करावे असे मत आहे. याकामी मंडप पुरविणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी वाढीव खर्च होणार आहे. त्याअनुषंगाने विषयांकित कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदर कामासाठी

सुमारे र.रु.१५,९७,९५६/- इतका वाढीव खर्च होणार आहे. तरी सदर कामासाठी खालीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | सन २०१७-१८ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३९,४०,४१ अंतर्गत सन २०१७ सार्वजनिक महापालिका निवडणूकांसाठी मंडप विषयक व इतर अनुषंगिक कामे करणे. | १९५ | ४२ | १००००० | १४००००० | ० | १५००००० |
| २ | सन २०१७-१८ साठी क प्रभागातील विविध प्रभागांत कंपनी/ महानगरपालिका यांनी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे. | १९० | २ | ५०००००० | ० | १४००००० | ३६००००० |
| | | | | ५१००००० | १४००००० | १४००००० | ५१००००० |

तरी वरीलप्रमाणे कामासाठी तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१२ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १०/०८/२०१७

सूचक – मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.मोरेश्वर भोंडवे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव…

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५५३ दि.२१/०६/२०१७ मधील “नमुद तपशीलानुसार व दरानुसार (सर्व करांसहित)” या मजकुराऐवजी यातील कंसातील “सर्व करांसहित” हा शब्द वगळून त्याठिकाणी “सदर योजनेअंतर्गत मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत होणा-या प्रशिक्षणास जी.एस.टी. लागू असेल तर होणा-या प्रशिक्षणानुसारच्या देय रक्कमेसह त्यावर जी.एस.टी. नुसार होणारी अतिरिक्त रक्कम वेगळी देण्यात यावी. सदरचा होणारा प्रत्यक्ष खर्च हा सन २०१७-१८ सालातील महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर उपलब्ध असलेल्या/होणा-या तरतूदीतून करणेत यावा त्यानुसार” अशी दुरुस्ती करणेस व सदर दुरुस्तीसह मुळ ठराव कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१३ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १०/०८/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव…

पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रभाग क्रमांक १३ यमुनानगर मधील नाना नानी उद्यान व जलतरण तलाव हे म.न.पा. ने विकसित केले असून, सदर उद्यानाचे/तलावाचे वार्षिक रु.३२००००.०० याप्रमाणे १ वर्ष कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर देखभाल व संरक्षणाचे काम रुद्र इंटरप्रायझेस यांना देण्यात यावे तसेच विश्वकर्मा उद्यान व अहिल्याबाई होळकर उद्यान येथील देखभाल व संरक्षणाचे कामकाज शिव स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित यांना वार्षिक रु.३९००००.०० याप्रमाणे १ वर्ष

कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर देण्यास व यासाठी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१४ विषय क्रमांक – ५०

दिनांक – १०/०८/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.उत्तम कैंदळे

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर,मा.उत्तम कैंदळे यांचा प्रस्ताव…

प्रभाग क्र.१४ येथील कै.आकाश काळभोर व्यायामशाळा हिंदुस्थान रिलायबल स्पोर्टस् क्लबला (HRS क्लब) या संस्थेस २४ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८१५ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १०/०८/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उषा मुंढे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव…

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील मतीमंद,मुकबधीर,अपंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी घर ते शाळा व शाळा ते घर अशी बस प्रवासासाठी महामंडळामार्फत खालील पांच शाळांना बसेस सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात पुरविलेल्या आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | खेपेचा मार्ग | बिलाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मुकबधीर विद्यालय निगडी | खडकी बाजार ते मुकबधीर शाळा | ७७४४०० |
| | | भोसरी ते मुकबधीर शाळा | ५२८००० |
| २ | कामायनी विद्यालय निगडी | बोपोडी ते कामायनी शाळा | ७२१६०० |
| | | भोसरी ते कामायनी शाळा | ६३३६०० |
| ३ | ब्रम्हदत्त विद्यालय निगडी | भोसरी ते ब्रम्हदत्त विद्यालय | ७०४००० |
| | | पिंपरी रोड ब्रम्हदत्त विद्यालय | ७०४००० |
| ४ | अपंग विद्यालय निगडी | अपंग विद्यालय यमुनानगर ते काळभोरनगर | ३५२००० |
| ५ | साई संस्कार संस्था संभाजीनगर | दापोडी ते साईसंस्कार संस्था संभाजीनगर | ८४४८०० |
| | | **एकूण -** | **५२६२४००** |

वरील मतीमंद, मुकबधीर, अपंग विद्यार्थ्यांच्या शाळांना पुरविण्यात आलेल्या बससेवेसाठी महामंडळाने त्यांचे नियमानुसार बिलाची रक्कम रुपये ५२,६२,४००/- अदा करणेबाबत कळविलेले आहे. त्यास अनुसरुन महामंडळाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात वरील कारणास्तव पुरविलेल्या बसेसच्या बिलांची रक्कम अदा करण्यास तसेच महामंडळाने मतीमंद, मुकबधीर, अपंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी सन २०१६-१७ या वर्षाचे पूर्वी देखील ज्या बसेस पुरविलेल्या आहेत व त्यापोटी महामंडळाने मागणी केलेली रक्कम अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८१६ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १०/०८/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भः- मा.राजू मिसाळ, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव…

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड फेस्टिवल दि.०१/०९/२०१७ ते ०३/०९/२०१७ या कालावधीत साजरा करणेत यावा. यातील सर्व कार्यक्रम १) कै.अंकुशराव लांडगे सभागृह, भोसरी, २) प्रा.रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड, ३) नटसम्राट निळू फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव येथे घेण्यात यावेत. सदर पिंपरी चिंचवड फेस्टिवल करिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-**अ) पिंपरी चिंचवड शहरात गणेश फेस्टिवल सुरु करणेत यावा. त्याचे धोरण निश्चित करावे.

आ) गणेश फेस्टिवलमध्ये लावणी वगळून अन्य चांगले, दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. सर्व कार्यक्रम हे कै.रामकृष्ण मोरे सभागृह येथेच आयोजित करावेत.

इ) गणेश फेस्टिवलचे आयोजन करणेकरीता करावयाचे नियोजनासाठी मा.सहा.आयुक्त, जनतासंपर्क विभाग यांनी मा.महापौर यांचेवतीने बैठक बोलविण्यात येऊन मा.महापौर, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, यांचेसमवेत बैठक घेण्यात यावी. मा.सहा.आयुक्त, जनतासंपर्क विभाग यांनी मा.महापौर यांचेवतीने संपूर्ण कार्यक्रमाची रुपरेषा स्पष्ट करुन ती जाहीर करावी.


ई) मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.वैशाली काळभोर, मा.राजू मिसाळ आणि मा.माधुरी कुलकर्णी या सन्मा.सदस्यांनी सूचना मांडल्या आहेत. त्यांच्या सूचनांचा आदर करुन या विषयाला मंजूरी देण्यात येत आहे.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/६४/२०१७
दिनांक - २१/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.